## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

**तक्रार क्रमांक : १८८३/२०२१**

**तक्रार क्रमांक : १४११/२०२२**

**तक्रारकर्ता, श्री.अन्सारी दिलशाद अहमद मो.इस्माईल**
२८०, मंगल बाजार स्लॅब, जैतुनपूरा,
ता.भिवंडी, जि.ठाणे.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त, प्रभाग समिती क्र.५, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, जुना एस.टी.स्टॅण्ड, कापआळी, ता.भिंवडी, जि.ठाणे ४२१ ३०२.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त, प्रभाग समिती क्र.५, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, जुना एस.टी.स्टॅण्ड, कापआळी, ता.भिंवडी, जि.ठाणे ४२१ ३०२.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ०२.०४.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| ०९.०२.२०२१ | -- | २८.०८.२०२१ | २६.१०.२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि. ०९.१२.२०२१ व दि.२१.१०.२०२२ रोजीच्या दोन अर्जान्वये *" कोणतीही माहिती मिळालेली नाही."* असे कारण नमूद करुन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८(१) अन्वये एकाच माहिती अर्जासंबंधीत दोन तक्रार अर्ज दाखल केले आहेत. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ०२.०४.२०२५ रोजी एकत्रित सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी श्री.बाळाराम के.जाधव, सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती क्र.५, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*" घर नं.९५ मोठा वाजा मोहलला कैसरबाग अशी मिळकत बाबत महापालिकातर्फे दिलेल्या नोटीस, केव्हीट व फोटोकॉपी व एम.आर.टी.पी.पोलीस गुन्हा नोंद प्रत सही शिक्क्यानिशी मिळावी. "*

सदर प्रकरणी आजच्या सुनावणींच्या वेळी तक्रारकर्ता यांनी असे नमूद केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही. त्यासंदर्भात खुलासा करताना जन माहिती अधिकारी यांचे तर्फे असे सांगण्यात आले की, तक्रारकर्ता यांना माहितीचे शुल्क भरण्याबाबत दि.२७.०३.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यांनी शुल्काचा भरणा न केल्याने, त्यांना माहिती देण्यात आलेली नाही. तथापि या ठिकाणी असा मुद्या उपस्थित होतो की, शुल्क भरण्याबाबत माहिती अर्जप्राप्त दिनांकापासून ३० दिवसांच्या आत अर्जदारांना कळविणे आवश्यक आहे. याठिकाणी शुल्क भरणेबाबतचे पत्र जवळपास एकोणपन्नास दिवसानंतर देण्यात आल्याचे दिसून येते. वास्तविक ही माहिती विनाशुल्क पुरविणे आवश्यक होते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांची ही कृती बेकायदेशीर असल्याचे दिसून येते.

यापुढील बाब अशी आहे की, तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलामध्ये तत्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.दिपक पुजारी, उप आयुक्त (मु.), भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांनी दि.२६.१०.२०२१ रोजी जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना ०७ दिवसांत माहिती पुरविणेबाबत आदेशित केले आहे. त्यानंतरसुध्दा

तक्रारकर्ता यांना अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी जाणीवपूर्वक माहिती नाकारल्याचे स्पष्ट दिसत आहे.

यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. तसेच, आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्र.सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती क्र.५, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांनी **तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती हा आदेश मिळाल्यापासून ०८ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारीश्री.सुधिर संपत गुरव, प्र. सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती क्र.५, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक ०९.०२.२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०७.०५.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०२ एप्रिल, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री.सुधिर संपत गुरव, सहा.आयुक्त, प्रभाग समिती क्र.५, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, जुना एस.टी.स्टॅण्ड, कापआळी, ता.भिवंडी, जि.ठाणे ४२१ ३०२.

**– यांना प्रत**

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त,
प्रभाग समिती क्र.५, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,
जुना एस.टी.स्टॅण्ड, कापआळी, ता.भिवंडी, जि.ठाणे ४२१ ३०२.

**यांचे मार्फत रवाना.**